# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्रीमती उमा खापरे,** श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र व मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, नगरपालिका कार्यपध्दती नियमांद्वारे परिषद व समितीच्या बैठकीत रचनात्मक चर्चा व

विचारविनिमय सुनिश्चित करण्यासाठी सभा घेण्याबाबतचे तपशील व कार्यपध्दती नमूद केल्या असणे, एमसीजीएमच्या सर्वपरिषद व समितीच्या बैठकीत एमसीजीएमचा सविस्तर महानगरपालिका कार्यपध्दतीविषयक नियम व विनियम (Bye-Laws) अनुसरण होत असणे, राज्यातील अन्य २६ नगरपालिकांमध्ये नगरपालिकांची कार्यपध्दती केली जाणे व त्याआधारे मनपा कार्यपध्दती नियम तयार व मंजूर केले जाणे, परंतु त्यामध्येच अनेक त्रुटी असणे, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यपध्दती नियमांना मान्यता न मिळाल्यास अन्य २६ नगरपालिकांमध्ये योग्य चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिका कार्यपध्दती नियमावलीचा मसुदा तयार करण्यास मान्यता द्यावी, अशी मागणी जनतेतून होत असणे, परंतु त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (३) व (४)]** —

**(३)** **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यातील टाकळी गावात राहणाऱ्या नागरीकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे गावातील नागरीकांनी २६ जानेवारी, २०२३ रोजी शांततेने आंदोलन केले असता पोलिसांनी सुमारे ५९ गावकरी महिला व पुरुषांवर गुन्हे दाखल केल्याची बाब उघडकीस येणे, टाकळी येथे राहणाऱ्या ग्रामस्थांनी २३ जानेवारी, २०२३ पासून तहसिल कार्यालयासमोर शांततेने उपोषण सुरु करणे, परंतु संबंधित पोलीसांनी ग्रामस्थांशी चर्चा न करता आंदोलन करणाऱ्या पुरुष व महिला ग्रामस्थांवर गुन्हे दाखल केल्यामुळे त्यांच्यात पसरलेले भितीचे वातावरण, आंदोलकांनी संबंधित एसडीओ, एसडीपीओ या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी कोणावरही गुन्हे दाखल करण्यात येणार नाही असे आश्वासन देऊन सुध्दा नागरीकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असणे, शांततेने आंदोलन करणाऱ्या नागरीकांविरुध्द गुन्हे दाखल न करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(४) **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर जिल्हा परिषदेतील प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत कौशल्य विकास या शिर्षकाखाली रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत नागपूर जिल्हयातील १३ तालुक्यात दुग्ध विकास व शेळीपालन लाभार्थ्यांकरीता गट वाटप योजना राबविलेली असणे, या योजनेत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतर योजना राबवून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी १७ नोव्हेंबर २०२२ ला ग्रामविकास विभागाला आपला स्पष्ट अहवाल सादर केलेला असणे, शासन निर्णय दि. १२ डिसेंबर २०१७ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ यांना गायगट व शेळीगट उपलब्ध करून देणेसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजनेमधून वगळण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, जिल्हा परिषद द्वारा याबाबत मागणी केली असता महामंडळाने दिनांक २५/५/२०२१ च्या पत्रानुसार रोठा करण्यांस असमर्थता दर्शविल्याचे दिसून येत असणे, जिल्हा परिषद नागपूरने थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) करून योजना राबविणेबाबत शासनाचे मार्गदर्शन घेणे स्पष्ट केलेले असतांनाही जि.प. नागपूर पशु संवर्धन विभाग यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता योजना राबवून लाभार्थ्यांची योग्य निवड न करता मर्जीतील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे दिसुन येत असणे, तसेच लाभार्थ्याला देय केलेल्या गाय गट व शेळी गट अनेक लाभार्थ्यांना पुरवठा कागदोपत्री दाखवून व जिल्हयाच्या काही तालुक्यातच वाटप केल्याचे निदर्शनास आले असणे, त्याबाबत जि.प. सदस्य तथा लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रार करूनही कोणतीही दखल जि.प. प्रशासनाने घेतलेली नसणे, तसेच कोणतीही कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांवर केलेली दिसून येत नसणे, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र अंतर्गत निधीचा गैरवापर करून योग्य लाभार्थ्यांची निवड व योजनेची निकष न पाळता तथा जि.प. पदाधिकाऱ्याच्या पदाचा गैरवापर करून शासनाच्या निधीचा अपव्यय व भ्रष्टाचार केल्याने तथा यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने शासनाप्रती रोष निर्माण होऊन असंतोषाची भावना तयार होत असणे, तातडीने याबाबत भ्रष्टाचाराची संपूर्ण चौकशी योग्य यंत्रणेमार्फत करून दोषी अधिकारी व जि.प. पदाधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत शासनाची आवश्यक कार्यवाही व प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (५)] —**

(५) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण हे पाणी साठवण्याच्या क्षमतेनुसार राज्यातील सर्वात मोठे धरण असून त्याचे क्षेत्रफळ १४८५८ चौ.किमी असणे, धरणाची पाणी साठवण क्षमता ११७ टिएमसी असणे, परंतु उजनी धरणाच्या प्रचंड विस्तारामुळे उजनी धरणात पाण्याबरोबर वाहुन येणाऱ्या गाळाचे प्रमाण वाढत असणे, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) सन २००७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार उजनी धरणात १२.७७ टक्के इतका गाळ असणे, सन २०११ साली केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दिल्लीच्या तेजो विकास इंटरनॅशनल संस्थेने डीजीपीस तंत्रज्ञानानुसार केलेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण १२.७७ टक्केवरून २७.९४ टक्के पर्यंत गेलेले आढळुन येणे, त्यामुळे उजनी धरणाची पाणी साठवण क्षमता ३२ टिएमसी नी कमी झाल्याचे समोर येणे, दर वर्षी उजनी धरणात ०.४३ टिएमसी गाळ साचत असल्याचे अभ्यासातुन समोर येणे, परिणामी गेल्या ११ वर्षात पुन्हा उजनी धरणात आलेला वाळुमिश्रीत गाळ लक्षात घेता सद्यस्थितीत उजनी धरणात सुमारे ३६ टक्के वाळुमिश्रीत गाळ असणे, त्यामुळे पाणी साठवण क्षमता ४३ टिएमसी नी कमी झालेली असण्याचा तज्ञांचा अंदाज असणे, दर १० वर्षानी धरणातील गाळाचा आढावा घेऊन अतिरीक्त गाळ काढणे अपेक्षित असताना गेल्या ४२ वर्षात उजनी धरणातील गाळ काढण्यात आलेला नसणे, राज्य सरकारने २०१७ साली उजनी धरणातील गाळ काढण्यासाठी निविदा प्रसिद्ध करणे, परंतु गाळ काढण्याच्या कामाला अजुनही परवानगी मिळालेली नसणे, परिणामी पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने सिंचनक्षमता कमी होउन पाणी वाटपाच्या नियोजनात विस्कळीतपणा येणे, वर्षभरात शेतीसाठीच्या पाण्याची आवर्तने कमी होणे, तसेच पाणीपुरवठा योजनांना उन्हाळ्यात अपुरा पाणीपुरवठा होणे, अलीकडच्या काही वर्षात धरण परिसर आणि सोलापूर जिल्ह्यात निर्माण होणारी तीव्र अवर्षणस्थिती आणि पाण्याची वाढती मागणी पाहता उजनी धरणाच्या पाणीवाटपावर मर्यादा येत असणे, परिणामी भविष्यात सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता असणे, यामुळे लाभक्षेत्रातील शेतकरी व नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे शासनाने उजनी धरणातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

अग्रिम प्रत

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (६) व (७)] —**

(६) **सर्वश्री सुधाकर अडबाले,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सत्यजीत तांबे, जयंत आसगावकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने माहे जून, २०२२ मध्ये विनाकारण अधिकारी/कर्मचारी यांचे नियतकालिक बदलीस स्थगिती देणे, त्यानंतरही ही स्थगिती न उठविली जाणे, मागील दोन वर्षापासून बदली प्रक्रिया बंद असणे, विशेषत: जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी नविन सरकार आल्यानंतर बदली न करणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष पसरला असणे, जलसंपदा विभागाच्या नाकर्तेपणामुळे कर्मचाऱ्यांना बदलीस पात्र असूनही एकाच ठिकाणी चार-पाच वर्षे काम करावे लागणे, जलसंपदा विभागातील पदोन्नती प्रक्रियाही रखडलेली असणे, क्षेत्रीय कार्यालयातील महत्वाची पदे रिक्त असणे, तरीही त्याकडे जलसंपदा विभाग दुर्लक्ष करीत असणे, याकरीता तातडीने नियतकालिक बदली प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.राजहंस सिंह, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील म्हाडा कोंकण गृहनिर्माण मंडळ व मुंबई मंडळ यांच्याकडून शहर आणि ग्रामीण भागासाठी घरांची लॉटरी काढली जाणे, लॉटरी विजेता ठरणाऱ्या प्रत्येक अर्जदारांकडून दक्षिण मुंबईसह महाराष्ट्रातील पंधरा वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला घेण्यात येणे, त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या मराठी माणसांकडून म्हाडाने १५ वर्षाचा (अधिवास) वास्तव्याचा दाखला मागू नये, मराठी माणसांना सदर अटीतून वगळण्यात यावे, अशी मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून म्हाडाचे उपाध्यक्षांकडे लेखी निवेदनाद्वारे नुकतीच करण्यात येणे, परंतु अद्यापपर्यंत निर्णय न होणे त्यामुळे शासनाने यांची तातडीने दखल घेऊन मराठी माणसांना न्याय देऊन सदर अटीतून वगळण्याची गरज, शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यकता."

अप्रकाशित

(८) **श्री.अनिकेत तटकरे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अलिबाग शहरातील (जि. रायगड) गोविंद बंदर येथील डम्पींग ग्राऊंडवर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री ११ च्या सुमारास लागलेल्या आगीमुळे शहरामधील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरणे, डम्पींग ग्राऊंडमधील कचऱ्याला वारंवार आग लावली जात असल्याने या परिसरामध्ये धुराचे साम्राज्य पसरून प्रचंड प्रदूषण होत असणे, वयोवृद्ध आणि बालकांचे आरोग्य धोक्यात येत असणे, धुरामुळे नागरिकांना खोकल्याचा त्रास होऊन नागरिकांना भररात्री घराबाहेर यावे लागणे, प्रदुषणामुळे जेष्ठ नागरीकांनीसुध्दा तात्पुरते शहराबाहेर जाण्याचा निर्णय घेणे, डम्पींग ग्राऊंडवर दर १५ ते ३० दिवसांनी अशाचप्रकारे जाणून बुजून आग लावली जात असल्याने स्थानिक नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, अलिबाग नगरपालिकेकडून रस्ते सफाई करणे , घरोघरी घंटागाडीद्वारे कचरा संकलन करणे, कचरा डम्पींग ग्राऊंडवर नेऊन टाकणे व मृत जनावरांची विल्हेवाट लावणे, बेणणी काढणे, माती उचलणे इत्यादी कामासाठी रु. ६ कोटी ७३ लाख २४ हजार ७२० इतकी रक्कम कंत्राटदारांना अदा करुनही कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट न लावता आग लावून स्थानिक नागरीकांचे आरोग्य धोक्यात आणले जात असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली चिडीची भावना, डम्पींग ग्राऊंडवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारांना कचऱ्याला आग न लावता तो इतर योग्य मार्गाने नष्ट करण्याची तसेच या आगीबाबत सखोल चौकशी करुन आग लावणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.सचिन अहिर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपलिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी, त्यांच्या पालकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर व्हाव्यात तसेच खाजगी आरोग्यसेवेप्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिकेकडून अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्याबाबत सन २०१८ मध्ये घोषणा करण्यात येणे, त्यानुसार सन २०१८ च्या अर्थसंकल्पापासून दरवर्षी १ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद देखील करण्यात येणे, तथापि चार वर्षे उलटून देखील सदर सेंटर अद्याप रुग्णसेवेसाठी कार्यान्वित झालेले नसल्याचे दिनांक ३१

अस्सुधारित प्रत

डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेने विशेष मुलांसाठी एकाच छताखाली सोयीसुविधा मिळण्याचे दृष्टीकोनातून एकूण ३६,००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या जागेत अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर, नागपाडा बेलासिस रोड या मार्गावर सेंटर उभारण्यात येणे व त्यासाठी भांडवली खर्च ४ कोटी तर महसूली खर्च १० कोटी इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली असणे असे असतांना देखील अद्याप अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरु करण्यात न आल्याने ही योजना फक्त कागदावरच आहे की काय असे जनतेमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, त्याप्रकरणी शासनाने चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, परिणामी मुंबईतील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर केंद्र सुरु करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(१०) **श्री.प्रविण दरेकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परभणी जिल्ह्यातील पाथरी नगर परिषद अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करुन (संस्था क्र.पी.बी.एन.एच.एस.जी/१०४) यांनी सर्वे नं ९/१ आणि ८ गैरमार्गाने ताब्यात घेणे, सदर जागेवर कोणत्याही प्रकारच्या नगर प्रशासनाच्या परवानग्या न घेता अनधिकृत पध्दतीने त्या जागेवर सर्व्हीस रोड व ओपन स्पेसवर व्यापारी संकुल बांधकाम करणे, ले आउट करणे, परवानगी नसणे, सदर इमारतीस बाबा टॉवर नाव देऊन अनधिकृत बांधकाम करुन संकुलाचे भाडे व्यापाऱ्याकडून घेणे, सर्व्हीस रोड वर गाळे बांधणे, त्यातील गाळे भाडयाने देणे, गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर वाणिज्य इमारत बांधकाम झाल्यामुळे गृहनिर्माण कायद्याचा भंग होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री.जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू होत्या, सदर चारा छावण्यामध्ये दाखल जनावरांची गुरे छावणी व्यवस्थापन यंत्रणेमध्ये नोंदणी करून आठवडयातून एकदा बारकोडद्वारे स्कॅनिंग केल्यानंतर ऑनलाईन हजेरीद्वारे अनुदान वितरित करण्याबाबत निर्देश देण्यात

अग्रक्रम प्रत

आले असणे, सदर ऑनलाईन हजेरीप्रमाणे ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२,५४,२७,२९९/- इतके अनुदान शासनास समर्पित करण्यात आले असणे, सदर समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्यादृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८.४.२००६ व दिनांक १०.७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती गठीत करून सदर समितीने सुधारीत प्रस्ताव सादर केल्याचे कळविले असणे, त्या अनुषंगाने समितीच्या निर्णयामध्ये असे म्हणण्यात आले आहे की ज्या पशुधनाच्या यंत्रणेमध्ये कधीतरी स्कॅनिंगनुसार उपस्थितीची नोंद झाली असणे, त्याची इतर नोंदीच्या आधारे पडताळणी उपस्थितीची संख्या ग्राहय धरण्यात यावी व त्यानुसार किती निधी देणे आवश्यक आहे हे प्रमाणित करून सुधारित प्रस्ताव राज्य शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे निर्णय घेण्यात येऊनही अद्याप जिल्हाधिकारी, सोलापूर, विभागीय आयुक्त, पुणे यांनी यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१,४७,१४,९२२/- रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२,२०,९६,२५१/- रूपये इतक्या अनुदानाची रक्कम चारा छावण्यांना देण्याचे प्रलंबित असल्याने, चारा छावणी चालकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील अनुदानाची रक्कम राज्य शासनाकडून तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

(१२) **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात कोचिंग क्लास फक्त शाळा-कॉलेजपुरते मर्यादित नसून त्यांचे अनेक प्रकार असणे, दहावी, बारावी, विद्यापीठांचे अभ्यासक्रम, बँकिंगच्या परीक्षा, स्पर्धा परीक्षा, एमपीएससी/यूपीएससी यांचे कोचिंग क्लास यांचे पेव फुटले असणे, इंग्रजी स्पोकन क्लास, विविध परकीय भाषा शिकण्याचे वर्ग, संगीत, नृत्याचे क्लास, अगदी शेअरमार्केटचे शिक्षण देणारेही क्लास असणे, पोलिस भरती, तलाठी, ग्रामसेवकपासून ते स्टाफ सिलेक्शन कमिशन आणि यूपीएससी अंतर्गत सगळे शिकवणी क्लास सर्वत्र उपलब्ध होऊ लागले असणे,

अप्रकाशित प्रत

या क्लासच्या स्वतःच्या नोट्स, सराव परीक्षा, त्यांचे वेगळे पैसे, उन्हाळी वर्ग, शॉर्ट टर्म कोर्सेस, अकरावीनंतर बारावीचे फक्त व्हेकेशन, सीईटी प्रवेश परीक्षा क्लास असे अनेक प्रकारचे खाजगी क्लासेस राज्यात सुरु असणे व यातून हे क्लास चालवणारे कोट्यवधी - अब्जावधी रुपये कमावत असणे, राज्यात दहावी, बारावी राज्य मंडळाची आणि पुढे सर्व प्रवेश परीक्षेला सीबीएसई, आयसीएसई, आयबी, बोर्डाचा अभ्यासक्रम असा विरोधाभास चालू असताना शहरी व ग्रामीण शाळा, कॉलेजातील प्रचंड तफावत जाणवू लागणे, साधा किराणा दुकानदार शॉप अॅक्ट लायसन्स काढत असणे, पुढे त्याच्या दुकानात वजनकाटा तपासणारे, अन्न-औषधीवाले, बालकामगार तपासणारे अधिकारी तपासण्या करत असणे, प्रत्येक व्यवसायासाठी तपासणी करणाऱ्या स्वतंत्र यंत्रणा असणे, मग कोट्यवधी- अब्जावधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या कोचिंग क्लासची सरकारदरबारी नोंद करणे सुद्धा अत्यंत आवश्यक असणे, त्यांच्या जाहिरातीतील दाव्याची सत्यता तपासून पाहणारी यंत्रणा, तेथे मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र व्यवस्था, अपघात, अग्निशमन यंत्रणा, ऑक्सिजन सिलेंडर, वैद्यकीय प्राथमिक उपचार यांचीही व्यवस्था आवश्यक असणे, राज्यभर अशा क्लासची संख्या लाखोंनी असून अशा कोचिंग क्लासमध्ये शिकवणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या वेतनाबाबत नियम करणे, त्यांच्यासाठी या क्लास संचालकांनी आपला नफा खर्च करणे, अशा शिकवणी वर्गाला सर्व्हिस इंडस्ट्रीचा दर्जा असेल तर त्यांना सर्व इंडस्ट्रीचे कायदे लागू करणे, कोचिंग क्लास व्यापार असेल तर त्यांना कोणते कायदे लागू पडतात या सर्व प्रश्नांसाठी राज्यातील खासगी क्लासेसचे नियमन करण्याची व राज्य सरकारने यावर देखरेख ठेवण्यासाठी नियम व कायदे करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अस्वाक्षरित प्रत

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक १** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातील अंबाशी येथे राहणाऱ्या टायपिंग इन्स्टीट्युटच्या विद्यार्थ्यावर झालेल्या हल्याबाबत.

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

पारगांव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटूंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून आल्याबाबत.

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (३)] —**

(३) **श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) निवेदन करतील :-**

खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या मुळ रक्कमेवर ३०० कोटी रुपयांच्या व्याजाची रक्कम शासनाला द्यावी लागत असल्याबाबत.

**(सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (४)] —**

(४) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ८** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी मठातील ५२ गाईंचा संशयास्पदरित्या मृत्यू झाल्याबाबत.

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (५) ते (७)] —**

(५) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक १३** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

डोंगारी (ता.तलासरी, जि.पालघर) येथे एका १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन व तिचा गळा दाबून हत्या केल्याची घडलेली घटना.

(६) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक १६** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील वर्धनगड बोगद्याच्या येथुन दाभहरण कुंडाच्या असणाऱ्या स्कोअर वॉल्वमधुन गावांना करण्यात येणारा पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करण्याबाबत.

(७) **श्री.आमश्या पाडवी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक १७** वर **महिला व बालविकास मंत्री** निवेदन करतील :-

जुगनी हिरिचापाडा (ता.धडगांव, जि.नंदुरबार) येथील महिलेने केलेल्या आत्महत्येबाबत.

अग्रिम प्रत

**(८)** **डॉ.मनिषा कायंदे,** सर्वश्री सुनिल शिंदे, सचिन अहिर, अॅड.अनिल परब, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २४** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

पुणे शहरातील मेट्रोच्या बांधकामामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्याने पुणे मेट्रोचे सदोष काम थांबविण्याबाबत.

**(९)** **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २७** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

मुंबईतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने व मुंबई महानगरपालिकेने उपाययोजना करण्याबाबत.

**(१०)** **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २२** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

महागाव तालुक्यातील कलगाव येथील सहायक पोलीस निरिक्षक यांनी तक्रारदारास केलेल्या मारहाणीबाबत.

**(११)** **श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २१** वर **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

राज्यात "इन्फल्युएंझा ए" (एच-३, एन-२) व्हायरस या गंभीर विषाणूचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत असून सदरहू साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याबाबत.

**(१२)** **श्री.कपिल पाटील, वि.प.स**. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक २३** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

सन २००१ नंतर शासनाने विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या शाळा व संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देऊन वेतन सुरु करण्याबाबत.

अमुद्रित प्रत

**चार : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस उप मुख्यमंत्री यांचे उत्तर.**

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सात : (क) (मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** सुरेश धस, प्रा.राम शिंदे, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, रामदास आंबटकर, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण पोटे-पाटील, वसंत

अप्रकाशित प्रत

खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे,

असुधारित प्रत

मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) (गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, विलास पोतनीस, विक्रम काळे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, अमोल मिटकरी, राजेश राठोड, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, वजाहत मिर्झा, अनिकेत तटकरे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे,

अस्वाक्षरित प्रत

कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा-२ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषी मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषी उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे, "ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क" या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिध्द केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठीत करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपुर्वक विलंब करीत असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर

अप्रकाशित

सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्यसरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरु करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असने, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ग) (मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३, व गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय उर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, विप्लव बाजोरीया, प्रा.राम शिंदे, सर्वश्री महादेव जानकर, प्रविण दटके, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"माहे जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या

अप्रकाशित प्रत

माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होऊन काम सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी.च्या मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटी पेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील व रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकर प्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे, तसेच एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या संदर्भातील शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे

अमुद्रित प्रत

वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता जेणेकरुन, पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांचे पार्किंगकरिता बहूमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य

अग्रिम प्रत

विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महानगरपालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(घ) **(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, अॅड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, विक्रम काळे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अनिकेत तटकरे, सचिन अहिर, वजाहत मिर्झा, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, अमोल मिटकरी, धिरज लिंगाडे, अरुण लाड, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, राज्यात अवैधपणे सुरु असलेल्या लॅबवर कारवाई करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन योजनेच्या मागणीकडे शासनाने जाणीव पुर्वक दुर्लक्ष करणे, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणूका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका

झालेल्या नसल्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार, एम.एस.आर.डी.सी व एम.एम.आर.डी.ए मध्ये अवास्तव कामाच्या निविदा मंजूर करुन सुरु असलेला भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिकांमध्ये, विशेषतः मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेली अनियमितता, मुंबई शहरातील सी-कोस्टल रोडचे काम संस्थ गतीने सुरु असणे, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत गैरव्यवहार झाला असणे, आपला दवाखान्यांमध्ये असलेला ओषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्यात विजेची प्रचंड होत असलेली मागणी, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याच्या घटनेमध्ये झालेली वाढ, वीजे अभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अस्वाक्षरित प्रत

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**आठ : (क) अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ —**

(१) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ — महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(२) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २ — महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(३) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३ — महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(४) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(५) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(६) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

(७) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मुलन करण्याबाबत विधेयक, २०२३" - श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांचे.

---

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव) —**

**(१) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच

अमुद्रित प्रत

शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) डॉ.वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३७**

"राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २०**

"विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे,

परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०२३.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्सुधारित प्रत